## नियमीत दरखास्त क्र.९१/१९९१ मधील
## निशाणी क्र.१ व ७२ वर आदेश
**CNRNO.MHLA110000181991.**

---

०१. सदर प्रकरणातील ऋणकोंनी नि.क्र.७२ ला दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियम २३ (२) खालील तरतुदीनुसार हरकती दाखल केलेल्या आहेत. सदर नि.क्र.७२ वरील हरकतीमधील थोडक्यात कथन असे आहे की, सदर ऋणकोंनी मा. उच्च न्यायालयामध्ये दुसरे अपील दाखल केलेले आहे. प्रकरणातील हुकूमनाम्यात नमूद केल्याप्रमाणे ० हे. ३३ गुंठे जमिन सर्वे नं.४/अ मध्ये अस्तित्वात नव्हती. त्यामुळे धनको हा सदर ० हे. ३३ आर जमिनीचा कब्जा मिळण्यास पात्र नाही. तसेच नि.दि.दा.क्र.२७७/७९ मध्ये मिळकतींची संयुक्त मोजणी झालेली नाही. धनकोंनी मिळकतींची संयुक्त मोजणी केल्यास व संयुक्त मोजणीमध्ये अतिक्रमण आढळुन आल्यास सदर ऋणको हे अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा देण्यास तयार आहेत. तसेच संयुक्त बांध आजरोजी अस्तित्वात नाही. त्यामुळे सदर प्रकरणातील हुकूमनाम्याची अंमलबजावणी होऊ शकत नाही. त्यामुळे प्रकरणामध्ये मुद्दे काढुन पुरावा नोंदवुन प्रकरण कायमस्वरुपी स्थगीत करण्याची व धनकोंना संयुक्त मोजणी करण्याबाबत निर्देश देण्याची ऋणकोंनी शेवटी मागणी केलेली आहे.

०२. सदर प्रकरणातील धनकोंनी नि.क्र.७८ ला म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकुर स्पष्टपणे नाकारलेला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, ऋणकोंना हुकूमनाम्याबाबत हरकत घेण्याचा अधिकार नाही. तसेच हुकूमनामा अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाला हुकूमनाम्याच्या पाठीमागे व

हुकूमनाम्याच्या बाहेर जाता येत नाही. तसेच धनको व ऋणकोंनी दाखल केलेल्या पुराव्यावरुन न्यायालयाने हुकूमनामा पारीत केलेला असल्यामुळे मिळकतींची पुन्हा मोजणी करण्याची आवश्यकता नाही. सदर प्रकरण सन १९९१ पासुन प्रलंबित असुन केवळ प्रकरण लांबविण्याकरिता ऋणकोंनी अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे ऋणकोंची मागणी फेटाळण्याची धनकोंनी शेवटी मागणी केलेली आहे.

०३. सदर प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रावरुन व दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांच्या युक्तीवादावरून सर्वप्रथम याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदर दरखास्त प्रकरण धनकोंनी नि.दि.दा.क्र.२७७/७९ मधील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरिता दाखल केलेला आहे. सदर नि.दि.दा.क्र. २७७/७९ मधील हुकूमनामा हा ऋणकोंनी धनकोंना हुकूमनाम्यात नमुद मिळकतीचा कब्जा देण्याबाबतचा आहे. सदर प्रकरणातील ऋणकोंनी हरकतीद्वारे हुकूमनाम्याविरुद्ध मा. उच्च न्यायालयामध्ये दाद मागितल्याचे कथन केलेले आहे. परंतु सदर प्रकरणाला मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा प्रकरणामध्ये दाखल केलेला नाही.

०४. तसेच सदर प्रकरणातील ऋणकोंनी हरकतीद्वारे नि.दि.दा.क्र.२७७/ ७९ मधील मिळकतीच्या मोजणीबाबत वाद उपस्थित केलेला नाही. त्यामुळे

याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, नि.दि.दा.क्र.२७७/७९ मधील हुकूमनामा अद्यापपर्यंत कोणत्याही न्यायालयाने रद्द केलेला नाही. तसेच हुकूमनामा अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयावर हुकूमनामा ज्याप्रकारे आहे, त्याप्रकारे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आहे. तसेच हुकूमनामा अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाला हुकूनाम्याच्या पाठीमागे अथवा बाहेर जाऊन आदेश पारीत करता येत नाही. तसेच नि.दि.दा.क्र.२७७/७९ मधील दाव्याचा निकाल गुणदोषावर झाल्याचे दाखल कागदपत्रावरुन स्पष्ट होते. त्यामुळे सदर ऋणकोंना नि.दि.दा.क्र.२७७/७९ मधील हुकूमनाम्याबाबत अथवा मोजणीबाबत प्रस्तुत प्रकरणामध्ये वाद उपस्थित करण्याचा अधिकार प्राप्त होत नाही.

०५. सदर प्रकरणातील ऋाणकोंनी हरकतीद्वारे हरकतीच्या अनुषंगाने प्रकरणात मुद्दे काढुन पुरावा नोंदवुन दरखास्त प्रकरण स्थगीत करण्याची मागणी केलेली आहे. सदर प्रकरणातील ऋणकोंच्या हरकतीमधील स्वरुपावरुन माझे असे मत झाले आहे की, नि.दि.दा.क्र.२७७/७९ मधील दाव्याचा निकाल गुणदोषावर झालेला असल्यामुळे हरकतीमध्ये मागणी केल्याप्रमाणे पुन्हा प्रकरणामध्ये मुद्दे काढुन पक्षकारांना पुरावा दाखल करण्यास संधी दिल्यास दरखास्त प्रकरणामध्ये ऋणकोंना नि.दि.दा.क्र.२७७/७९ मधील हुकूमनाम्याबाबत वाद उपस्थित

करण्याचा अधिकार दिल्यासारखे होणार आहे. त्यामुळे सदर हरकतीमधील कथन व प्रकरणातील कागदपत्रे विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, हरकतीमध्ये मागणी केल्याप्रमाणे प्रकरणामध्ये मुद्दे काढण्याची आवश्यकता नसुन प्रकरण स्थगीत करण्याची देखील आवश्यकता नाही. तसेच सदर प्रकरण सन १९९१ पासुन म्हणजेच २० वर्षापेक्षा जास्ती कालावधीपासुन प्रलंबित असुन सदर प्रकरणातील धनकोंना हुकूमनाम्याचे फळ मिळण्यासाठी हुकूमनाम्याची अंमलबजावणी लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. तसेच अर्जात नमूद केलेले कारण हे मिळकतींची संयुक्त मोजणी करण्याबाबत धनकोंना निर्देश देण्याची देखील आवश्यकता नाही. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

नि.क्र.७२ मधील हरकती नामंजूर करण्यात येत आहेत.

स्वा/-

दि. ०९.०४.२०१९.

(शि. म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,निलंगा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

Name of the Stenographer : M.N. Yenge
Name of the Court : Jt. C.J.S.D Court
(Shivkant M. Gourgond)
Date of Judgment/Order : 09.04.2019
Judgment/Order signed by presiding officer : 09.04.2019
Judgment/Order uploaded on : 10.04.2019